# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २३/०८/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यु

१) पो.स्टे. अरोली :– अंतर्गत मौजा खात ते रेवराल रेल्वे लाईनचे पटरीचे डाउन बाजुला येथे दिनांक २२/०८/२०२२ चे ०६.०० वा. ते ०९.०० वा. सुमारास यातील **मृतक– अनोळखी पुरूष, वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष** याचे प्रेत हे घटनास्थळी रेल्वेने कटुन मृत अवस्थेत दिसुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रेल्वे मास्टर राधेशाम प्रलाद खंगार वय ३८ वर्षे रा पावनी, पोस्टे खात जि. भंडारा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक श्रीकांत गौरकर हे करीत आहेत.

२) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत मौजा धानला येथे दि. १३/०८/२०२२ चे ११.४५ वा. पुर्वी **दिनेश दशरथ सेलोकर (मृतक), वय २७ वर्ष, रा. धानला** याने अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राशन केले. त्यास उपचाराकामी सामान्य रुग्णालय भंडारा येथे दि. १३/०८/२०२२ चे ११.५४ वा. भरती असतांना उपचारादरम्यान दि १५/०८/२०२२ चे १५.३० वा. मरण पावला. सदर मर्गचे कागदपत्रे पोस्टे भंडारा येथुन पो.स्टे. मौदा येथे प्राप्त झाल्याने मर्ग दाखल आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे प्रशांत काळे पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार हरीष यंगलवार मो.क्र. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

३) पो.स्टे. केळवद :– अंतर्गत २० कि. मी. अंतरावरील मौजा भदीपीपळा शिवार पांढुर्णा रोड येथे दि. ०२/०८/२०२२ चे १२.०० वा. सुमारास **सौ.उर्मीला रामनारायन सैनी(मृतक), वय ५१ वर्ष रा. रेसीडेंसी विठ्ठल नगर लालघाटी भोपाल (म.प्र.)** ही आपले पती, मुलगी आणि भाऊ सून असे मिळून सावनेर ते पांढूर्णा रोडने जात असतांना मौजा भदीपीपळा गाव जवळ त्यांचे कारचे टायर फुटल्याने मृतक हीचे मानेवर, छातीवर मार लागला. ती जखमी झाल्याने तिला उपचाराकामी एलेक्सीस हॉस्पीटल नागपूर येथे नेले असता उपचारा दरम्यान दिनांक १६/०८/२०२२ रोजी रात्री ०२.३४ वा. मरण पावल्सी. पो.स्टे. मानकापूर नागपूर शहर येथे ००/२२ अन्वये मर्ग दाखल करण्यात आला असुन सदर मर्ग चे कागदपत्रे पो.स्टे. केळवद येथे दि. २२/०८/२२ रोजी अन्वये प्राप्त झाल्याने मर्ग दाखल करुन तपासात घेतला.

. सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनि नरेन्द्र सनके पो.स्टे मानकापूर नागपूर शहर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार रामराव पवार मो. नं. ७८७५९८३३६० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर